**प्रेस नोट** **दिनांक १६/०५/२०१९**

**खडक पोलीस ठाणे,पुणे शहर**

**७० वर्षीय जखमी अवस्थेत मिळुन आलेल्या मनोरुग्ण व वयोवृध्द महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेवून महिलेस नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप परत दिले**

दि.१६.०५.२०१९ रोजी रात्रौ ०१.३० वाजण्याचे सुमारास खडक पोलीस ठाणे अंकित सदाशिव पेठ पोलीस चौकी येथे कर्तव्यावर असलेले पोलीस नाईक अमित जगताप हे पेट्रोलींग करीत असताना चिंचेची तालीम शुक्रवार पेठ पुणे याठिकाणी एक वयोवृध्द ७० वर्षीय महिला जखमी अवस्थेत रस्त्यावर पडलेली मिळुन आली. नमुद कर्मचारी यांनी तात्काळ सदर महिलेस रिक्षामधुन फडगेट पोलीस चौकी याठिकाणी आणुन तिच्या कडे नाव,पत्त्याबाबत विचारपुस करीत असताना ती काहीएक सांगत नव्हती.

सदर वयोवृध्द महिलेस औषधोपचाराची आवश्यकता असल्याने तीस वैद्यकीय उपचारकामी पोलीस ठाणेकडील महिला पोलीस शिपाई पुजा डेरे व मपोशि चित्रा ढगे यांचेसह ससुन हॉस्पीटल पुणे याठिकाणी नेण्यात आले. औषधोपचार केलेनंतर वैद्यकीय अधिकारी यांनी नमुद महिला ही मनोरुग्न असल्याचे सांगितले. सदर वयोवृध्द महिलेचे नातेवाईकांबाबत विचारपुस करीत असताना तिस कागद, पेन दिला असता, सदर महिलेने तिचे पतीचे नाव व मोबाईल क्रमांक लिहुन दिला. नमुद कर्मचारी यांनी मोबाईल क्रमांकावरील इसम नामे सुरेश केशवलाल शहा यांना संपर्क साधुन हॉस्पीटलमध्ये बोलाविले. त्यावेळी सदर इसमाने सदरची महिला त्यांची पत्नी सौ. विजया सुरेश शहा रा. २३२ शुक्रवार पेठ पुणे ह्या असल्याचे सांगुन ती मनोरुग्न असल्याचे सांगितले. नमुद मनोरुग्ण महिलेस नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आलेले आहे.

(राजेन्द्र मोकाशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.